**साक्षात्कार**

कधी कधी असंच होतं ना?

कुठून सुरुवात करावी कळतंच नाही.

भविष्यात दडलेला शेवट सुद्धा,

काय असेल तो वळतंच नाही !

म्हणूनच फार विचार ना करता,

जगवा प्रत्येक वर्तमान क्षण,

आणि लुटावा जमेल तसा -

आनंदाचा एक - एक कण !

दुःखांना करावा सलाम,

संकटांना म्हणावं आदाब..

सुख आलेच दारी कधी,

बिनधास्त फुलावे - होऊन गुलाब !

या क्षणाचे देणे -

या क्षणालाच द्यावे..

उद्या उजाडलाच पुन्हा तर,

एक नवे गीत गावे !!!

**- प्रीती देशपांडे**

http://www.meetipreeti.com/